महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५८ वा | दिनांक : २५/११/२०२४ | वार : सोमवार

## शरद पवार राजकारणातून संपले : माजी मंत्री आत्राम




**नागपूर :** शरद पवार यांनी पहिले पक्ष फोडण्याचे काम केले त्यानंतर माझे घर फोडण्याचे काम केले आहे. आता तर त्यांचे केवळ दहा आमदार आल्यामुळे आता स्वत:च ते संपले असून त्यांचे राजकारण संपले असल्याची टीका माजी मंत्री धर्मराव बाबा आत्राम केली. धर्मराव बाबा आत्राम नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. शरद पवार निवडणुकीत अजित पवारासह महायुतीच्या सर्व नेत्यांना लक्ष्य केले होते. जाहीर सभामधून गद्दार म्हणून आमच्यावर टीका केली. जनतेची सहानुभुती मिळवण्यासाठी पावसात भिजले. मात्र ते लोकांना आवडले नाही.

शरद पवार आमचे ज्येष्ठ नेते आहे. मात्र त्यांनी केलेले राजकारण जनतेला आवडले नाही. त्यामुळे त्यांचे राजकारण संपले. पावसात भिजण्याचे केवळ नाटक होते. अशा पावसात भिजल्याने सहानुभुती मिळत नाही. ते पावसात भिजले होते ते केवळ नाटक होते. त्यांनी प्रचाराच्या दरम्यान अनेक नाटके केली पण काही जमलं नाही. आघाडी ५०चा आकडा गाठू शकले नाही त्यामुळे विरोधकांचे राजकारण संपले असल्याची टीका त्यांनी केली.

माझा विरोधात मुलीला निवडणुकीत उतरवले असले तरी मी बाप आहे. माझा विजय हा माझा नसून तो माझ्या मतदार संघातील लोकांचा विजय आहे. मतदार संघात केलेली विकास कामे आणि जनतेचा असलेला विश्वास यामुळे मला जनतेनी पसंती दिली. आता २०२९ मध्ये होणाऱ्या निवडणुकीसाठी आतापासून कामाला लागले पाहिजे. माझ्या विरोधात निवडणुका लढवणारा पुतण्या असो कीं मुलगी असो, त्यांना माझ्या शुभेच्छा आहे. राजकारण राजकारणाच्या जागी असल्यामुळे त्याचा परिणाम आमच्या नात्यावर होणार नाही असेही आत्राम म्हणाले.

विशेष म्हणजे आमच्या योजना आणि कामाची पद्धत आणि अजित पवार यांनी केलेले सहकार्य बघता आलेला निकाल माझा मोठा विजय असल्याचे आत्राम म्हणाले. आता शरद पवार यांच्याकडे दहा शिल्लक राहिले आहे. त्यांनी चिंता करु नये.ते दहा जण आमच्यासोबत घेऊ. मात्र त्या संदर्भात कोणाशीही अजुनही बोलणे झाले नाही. पाच वर्ष आता लोकांचे काम करणे हेच आमच्यासमोरचे ध्येय असल्याचे आत्राम म्हणाले.

## संजय राऊत वेडे आहेत : संजय गायकवाड




**बुलढाणा :** बुलढाणा विधानसभा मतदारसंघातून विजयी झालेले शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी ठाकरे गटाचे संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. संजय राऊत यांना आम्ही गांभीर्याने घेत नाही. त्यांना आता मेंटल हॉस्पिटलमध्ये दाखल केले पाहिजे, अशा शब्दांत गायकवाड यांनी बोचरी टीका केली आहे.

संजय राऊत यांनी इव्हीएमवर शंका घेत महायुतीच्या विजायवर प्रश्न उपस्थित करत टीका केली होती. यावर संजय गायकवाड यांनी प्रत्युत्तर दिले आहे. संजय गायकवाड म्हणाले, इव्हीएममधून आदित्य ठाकरे हे देखील विजयी झाले आहेत. मग आता त्यावरही आक्षेप घेणार का? ठाकरे गटाचे लोकही निवडून आले आहेत न? त्यांचा हा रडीचा डाव आहे. महायुतीला मिळालेला विजय हा कामाचा परिणाम आहे. लाडक्या बहिणीचा परिणाम आहे. तसेच महाराष्ट्रातील जनतेने विरोधकांना धूळ चारली आहे, अशी टीका गायकवाड यांनी केली.

संजय राऊत यांनी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कोण हे गुजराती लॉबी ठरवेल, तसेच सरकारचा शपथविधी हा गुजरातमधील स्टेडियममध्ये घ्यावा, असा खोचक सल्ला राऊत यांनी दिला होता. यावर संजय गायकवाड म्हणाले, त्या संजय राऊत यांचे कोणतेही विधान आम्ही गांभीर्याने घेत नाही. ते वेडे आहेत. त्यांची आता मेंटल हॉस्पिटलमध्ये जाण्याची वेळ आलेली आहे. तसेच आता ते आयुष्यात कधीही खासदार होणार नाहीत, असेही संजय गायकवाड म्हणाले.

मराठी टायपिंगसाठी
डी.टी.पी.ऑपरेटर मुले पाहिजे
-------: संपर्क :------
साहिल कॉम्प्युटर्स
विद्यापीठ गेटजवळ, मोनूज हॉटेल,
जयसिंगपूरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)
मो. 8956362639 /8087880274

## आत्मपरिक्षण करण्यासाठी त्यांना आत्माच राहिला नाही : अब्दुल सत्तार

**छत्रपती संभाजीनगर :** उद्धव ठाकरे यांनी भाजपकडे भीक मागूनही त्यांना यश आले नाही. माझ्या मतदारसंघात त्यांनी केविलवाणी अवस्था झाली होती. उद्धव ठाकरे यांचा आत्मपरिक्षण करण्यासाठी आत्माच राहिला नाही, असा टोला अब्दुल सत्तार यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला आहे.

दरम्यान अब्दुल सत्तार पुढे बोलताना म्हणाले की, आजपर्यंत मी केलेल्या राजकारण एखाद्या पक्षाच्या अध्यक्षांवर माझ्या मतदारसंघात इतकी वाईट वेळ कधीच आली नव्हती, ही लाजीरवाणी गोष्ट आहे, असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

अब्दुल सत्तार म्हणाले की, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री व्हावे अशी आमची इच्छा आहे. पण दिल्लीमध्ये भाजपचे श्रेष्टी जो निर्णय घेतील तो मान्य असेल.

सिल्लोड विधानसभा मतदार संघात झालेल्या अटीतटीच्या लढतीत, शेवटच्या क्षणी अब्दुल सत्तार यांनी बाजी मारली. अब्दुल सत्तार यांनी चौथ्यांदा विजयाचा चौकार मारला असून या अटीतटीच्या लढतीत त्यांनी २४२० मतांनी विजय संपादन केला. सिल्लोड विधानसभा मतदारसंघासाठी शनिवारी सकाळी आठ वाजता शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयाच्या इमारतीत सुरुवात झाली. सोयगाव तालुक्यातील गावांपासून मतमोजणीस सुरुवात झाली. सुरुवातीच्या पाच फेऱ्यांपर्यंत महाविकास आघाडीचे सुरेश बनकर यांनी आघाडी घेतली होती. परंतु त्यानंतर अजिंठा येथील मतमोजणी सुरू झाल्यावर विद्यमान आमदार अब्दुल सत्तार यांनी चौदाव्या फेरीपर्यंत आपली आघाडी कायम ठेवली. यानंतर उंडणगाव पालोद गटाच्या मतमोजणीस सुरुवात झाल्यावर सुरेश बनकर यांनी पुन्हा आघाडी घेण्यास सुरुवात केली बनकर यांनी २४ व्या फेरीपर्यंत ३५८९ मतांची आघाडी घेतलेली होती.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ नोव्हेंबर २०२४

## मला मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची अपेक्षा : संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** मला मंत्रिमंडळात स्थान मिळण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मला न्याय देतील, असा विश्वास शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी व्यक्त केला. संजय राऊत यांनी महायुतीचे सरकार आणण्यासाठी जी बडबड केली, त्याबद्दल त्यांचे आभार मानतो, असा टोला शिरसाट यांनी लगावला. ते आज माध्यमांशी बोलत होते.

विधानसभा निवडणुकीत छत्रपती संभाजीनगर पश्चित मतदारसंघातून संजय शिरसाट यांनी विजय संपादित केला आहे. त्यानंतर त्यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी महायुतीच्या विजयाची कारणे सांगत संजय राऊत यांच्यावरही टीका केली.

यंदाच्या निवडणुकीतवेळी सामान्य मतदारांच्या काय होते, हे चांगल्या जाणकारांनाही समजले नाही. ओढून ताणून महायुतीचे सरकार येईल, असा सर्व कौल होता. परंतु, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना गेमचेंजर ठरली. महायुतीला निवडून द्यायचे हे लोकांनी ठरवले होते. महायुतीने केलेला काम, महायुतीतील एकता आणि सामान्यांना मिळालेला योजनेचा लाभ, यामुळे महायुतील प्रचंड बहुमत मिळाले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

## रणजितसिंह मोहिते पाटलांची हकालपट्टी करा : राम सातपुते





**सोलापूर :** रणजितसिंह मोहिते पाटील यांनी पूर्ण ताकदिने भाजपविरोधात काम केल. पक्षाच्या पराभवासाठी पैसे वाटले. त्यांच्या कार्यकर्त्यांनी पोलिंग एजंटला धमक्या दिल्या. त्यामुळे रणजितसिंह मोहिते पाटील यांची तात्काळ भाजपमधून हकालपट्टी व्हावी, असा गंभीर आरोप भाजप नेते व माजी आमदार राम सातपुते यांनी विधान परिषदेचे आमदार मोहिते पाटील यांच्यावर केला आहे.

राम सातपुते म्हणाले, आपला निसटता पराभव झाला. कार्यकर्ता लढला, भल्याभल्यांना नडला. भाजप कार्यकर्त्यांना धमक्या दिल्या, मारहाण झाली.भाजपने ज्या रणजितसिंह मोहिते पाटलांना आमदारकी दिली, साखर कारखान्याला आर्थिक बळ दिले, संपूर्ण ताकद दिली त्या रणजितसिंह मोहिते पाटील यांनी पूर्ण ताकदिने भाजपविरोधात काम केल. पक्षाच्या पराभवासाठी पैसे वाटले असल्याचा आरोप राम सातपुते यांनी केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस मतदारसंघात भाजपचे उमेदवार राम सातपुते यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादीचे उत्तम जानकर निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. येथील लढत अत्यंत चुरशीची झाली, मात्र अखेर राम सातपुते यांचा पराभव झाला आहे. त्यानंतर राम सातपुते यांनी रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यावर पराभवाचे खापर फोडले आहे.

फेसबुक पोस्ट लिहीत राम सातपुते यांनी रणजितसिंह मोहिते पाटील यांच्याविरोधात राम सातपुते यांनी टीका केली आहे. त्यांनी भाजपच्या विरोधात काम केले, पैसे वाटले, त्यांच्या कार्यकर्त्यांनी पोलिंग एजंटला धमक्या दिल्या, असे आरोप राम सातपुते यांनी केले आहे. तसेच त्यांची भाजप पक्षातून हकालपट्टी करण्याची देखील मागणी राम सातपुते यांनी केली आहे.

## योगींच्या 'बटेंगे तो कटेंगे'च्या नाऱ्यामुळे मतांचे ध्रुवीकरण : शरद पवार



**सातारा :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार कराड येथे आले होते. यावेळी त्यांनी पत्रकार परिषद घेतली. जशी अपेक्षा होती तसा हा निर्णय नाही, शेवटी लोकांनी दिलेला हा निर्णय आहे, अशी प्रतिक्रिया शरद पवारांनी निवडणुकीच्या निकालावर दिली आहे. पराभव का झाला याची माहिती घेणे, त्याची कारणमीमांसा करणे आणि नव्या जोमाने पुन्हा लढावे, असेही शरद पवार म्हणाले.

लाडक्या बहीणीवर बोलताना शरद पवार म्हणाले, की ही योजना केवल निवडणुकीसाठी होती. तसेच आम्ही सत्तेत असलो तर ही योजना सुरू राहील. योजना सुरू ठेवायची असेल तर आम्हाला मतदान करा, सत्ता दिली नाही तर योजना बंद करणार असे त्यांनी प्रचार सभेत बोलताना जनतेला व लाडक्या बहिणींना सांगितले होते, त्यामुळे याचा परिणाम निवडणुकीवर झाला, असे शरद पवार म्हणाले.

महाराष्ट्रात जवळपास सगळ्या जिल्ह्यात फिरलो. महाविकास आघाडीच्या सर्व नेत्यांनी पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली, परंतु हवा तसा निकाल समोर आला नाही, अशी खंत शरद पवारांनी व्यक्त केली आहे. महाविकास आघाडीने जातीचे राजकारण केले असा आरोप केला जात आहे, यावर बोलताना शरद पवारांनी यावर माझ्याकडे संपूर्ण माहिती नसल्याचे उत्तर दिले.

लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या गटाला लोकांनी मतदान केले. विधानसभा निवडणुकीत मात्र अजित पवारांना मोठ्या मतांनी निवडून दिले आहे. यावर बोलताना शरद पवार म्हणाले, हे असे का झाले यावर अभ्यास करणे गरजेचे आहे. तसेच पुढे बोलताना शरद पवार म्हणाले, अधिकृत माहिती आल्याशिवाय इव्हीएम मशीनवर बोलणार नाही. बटेंगे तो कटेंगे अशा घोषणांमुळे राज्यात मतांचे ध्रुवीकरण करण्यात झाले, असा आरोप शरद पवारांनी महायुतीवर लावला आहे.

अजित पवार आणि युगेंद्र पवार यांची तुलना होऊ शकत नाही, अजित पवारांना यश मिळाले हे मान्य करण्यात गैर काही नाही, असे स्पष्ट मत शरद पवारांनी व्यक्त केले आहे. लोकांनी दिलेल्या निर्णयाचा अभ्यास करणार तसेच घरी बसणार नाही, नव्या जोमाने पुन्हा लढणार, कर्तुत्ववान नवी पिढी तयार करणार, असा विश्वास देखील शरद पवारांनी व्यक्त केला आहे. आमच्यातून बाहेर गेलेल्यांना निवडणुकीत चांगले यश मिळाले. महाविकास आघाडीला देखील चांगला प्रतिसाद मिळत होता. विरोधी पक्ष नेते पदावर बसण्यासाठी तेवढे संख्याबळ नसल्याचे देखील पवार म्हणाले.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनी कराड येथे प्रीतीसंगमावरील समाधीला अभिवादन करण्यासाठी शरद पवार हे कराड येथे आज मुक्कामास आलेले आहेत. उद्या दि.25 नोव्हेंबर रोजी यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिदिन. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती दिनाच्या पूर्वसंध्येला कराड येथे माध्यमांच्या प्रतिनिधींशी शरद पवार बोलत होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ नोव्हेंबर २०२४

## कालच्या निकालाबद्दल जनतेच्या मनातही नाना पटोले



**मुंबई :** काल जो निकाल लागला त्याचे आम्हालाही आश्चर्य आहे, पण जनतेच्या मनातही प्रश्न आहेत. याबाबत आम्ही दिल्लीत जाऊन हायकमांडशी चर्चा करू असे विधान काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केले आहे.

नाना पटोले म्हणाले की, सोशल मिडियावर लोक म्हणत आहेत की हे जनतेचं सरकार नाही. लोकांमध्ये ही जनभावना निर्माण झाली आहे. लोकशाहीमध्ये जनता ही सर्वात महत्त्वाची असते. हे जनतेच्या मतांच सरकार नाही, असे जर खुद्द जनता म्हणत असेल तर कुठे ना कुठे तरी दाल मे काला है. त्यामुळे यासंदर्भात हायकमांडशी चर्चा करावी त्यासाठी मी दिल्लीला चाललोय.

नाना पटोले म्हणाले की, कालच्या निकालावर महाविकास आघाडीचे नेतेही चर्चा करतील. राज्यातला निकाल हा धक्कादायक आहे, राजकीय पक्ष म्हणून आम्हाला आश्चर्य आहेच पण सर्वसामान्यांनाही प्रश्न पडला आहे. भाजपचे हायकमांड पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या सभांना गर्दी होत नव्हती तरी त्यांना मतं कशी मिळाली हा प्रश्न लोकांना पडला आहे.

बाळासाहेब थोरात, नाना पटोले, पृथ्वीराज चव्हाण, विजय वडेट्टीवार यांच्यासह यशोमती ठाकूर, माणिकराव ठाकरे अशा काँग्रेसच्या दिग्गजांना मतदारांनी धक्का दिला आहे. राज्यात आमचीच सत्ता येईल, तसेच काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल, असा दावा करणारे दिग्गज नेते स्वतःचाच मतदार संघ वाचवू शकले नाहीत. त्यामुळे राज्यातील काँग्रेसचा हा मोठा पराभव मानला जात आहे.

## तू आमदार कसा होतो तेच बघतो : अजित पवारांनी दिले होते आव्हान




**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्यावेळी शिरूरचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अशोक पवार यांना भरसभेत चॅलेंज दिले होते. तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? अशा शब्दांत थेट आव्हान अजित पवारांनी दिले होते. या विधानसभा निवडणुकीत शरद पवारांनी अशोक पवार यांना शिरूर येथून त्यांना उमेदवारी दिली होती.

या विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाच्या अशोक पवार यांच्या विरोधात शिरूर येथे अजित पवारांनी ज्ञानेश्वर कटके यांना उमेदवारी दिली होती. शिरूर विधानसभा मतदारसंघातून ज्ञानेश्वर कटके यांनी १९२२८१ एवढी मते मिळवत दणदणीत विजय मिळवला आहे. तसेच अशोक पवार यांना ११७७३१ मते मिळाली व पराभूत झाले. त्यामुळे अजित पवारांनी दिलेले आव्हान देखील पूर्ण केले असल्याची चर्चा सुरू आहे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी अजित पवारांनी शिरूर लोकसभा मतदारसंघात जाहीर सभा घेतली होती. या सभेत बोलताना शरद पवार गटाचे शिरूरचे आमदार अशोक पवार यांना खुले आव्हान अजित पवारांनी दिले होते. आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय?, अशा शब्दात आव्हान केले होते.

पुढे अजित पवार म्हणाले होते, दिलीप वळसेंचा शपथविधी झाला आणि अशोक पवार यांची सटकली. ते म्हणाले, दादांनी दिलीप वळसे पाटलांना मंत्रिमंडळात घ्यायला नको होते. दादा एकटे जिल्ह्यातून गेले असते तरी आमची कामे झाली असती. त्यांच्या डाव्या आणि उजव्या हाताला कोण आमदार बसले होते. त्यांच्या कानात अशोक पवार यांनी असे सांगितले. आता अशोक पवार काय म्हणत होते ते मला त्या आमदाराने सांगितले. त्यानंतर अशोक पवार शरद पवार गटात गेले. त्यांना पवार साहेबांनी सांगितले की, पुढच्या वेळेस तुच मंत्री.

आता पुढच्या वेळेस मंत्री होण्याकरता त्यांनी कारखान्याची वाट लावली आणि मंत्री व्हायला निघाले. आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? अजित पवारांनी एकदा मनावर घेतले तर मी आमदार होऊ देत नाही. आता मी पण चॅलेंज देतो तू आमदारच कसा होतो ते बघतो. मी लोकांना सांगेन की यांची खरी औकात काय आहे, अशा शब्दात अजित पवारांनी चॅलेंज दिले होते.

## राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे : प्रकाश महाजन



**मुंबई :** उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र यावे, यासाठी आम्ही स्वतःहून साद यापूर्वी घातली होती. आता जर त्यांनी साद घातली तर राज ठाकरे निर्णय घेतील. असे विधान मनसेचे नेते प्रकाश महाजन यांनी केले आहे. तसेच माहीममध्ये भाजपने मनसेला एकटे पाडले असा आरोप सुद्धा महाजन यांनी केला आहे. विधानसभा निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाला तसेच राज ठाकरे यांच्या मनसेला चांगलाच दणका बसला आहे. त्यानंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र यावे, अशी चर्चा सुरू झाली आहे. यावर महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

प्रकाश महाजन म्हणाले, जेव्हा स्वतःच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो, जी मंडळी दुसऱ्यांच्या अस्तित्वावर प्रश्न निर्माण करत होती, त्यांचे अस्तित्व पणाला लागले तेव्हा आमची गरज त्यांना वाटते. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र यावे, यासाठी आम्ही स्वतःहून साद यापूर्वी घातली होती. आता जर त्यांनी साद घातली तर राज ठाकरे निर्णय घेतील, असे महाजन म्हणाले.

पुढे प्रकाश महाजन म्हणाले, समोरच्याची इच्छा काय आहे हे पाहिले जाईल. राज ठाकरे तर कधीही मैत्रीचा हात समोर करतात. पण आमचा पूर्वानुभव वेगळा आहे. अमित ठाकरे आजारी असताना त्यांनी आमचे नगरसेवक फोडले. ज्यांची सत्ता गेली त्यांना अस्वस्थता वाटू शकते, आम्ही सगळ्या गोष्टीला तोंड देऊ. पराभव आम्हाला नवीन नाही. त्यातून आम्ही उभारी घेऊ. आज मुंबई टोल फ्री झाला त्याचे यश मनसेचे आहे, असेही प्रकाश महाजन म्हणाले.

प्रकाश महाजन भाजपवर आरोप करताना म्हणाले, माहीम विधानसभेच्या निवडणुकीत भाजपने मनसेला एकट पाडले. दिलेला शब्द युतीच्या नावावर पाळला नाही. मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार आणि देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर वक्तव्य केले होते की, अमित ठाकरेंना आम्ही पाठिंबा देऊ. मात्र, त्यांनी युतीच्या नावावर माघार घेतली, राजकारणात शब्द पाळायचा असतो मोडायचा नसतो. भाजपने शब्द पाळला नाही.

राज ठाकरे या सगळ्या पराभवावर आत्मचिंतन करतील, निराशा, हताशा येईल. पण ती तात्पुरती असते, त्यातून आम्ही बाहेर पडून लढू. मनसे तीन ते पाच जागा जिंकू अशी अपेक्षा मला होती. लाडक्या बहिणीमुळे प्रस्थापित पक्ष सुद्धा वाहून गेले, त्यात आमचे सुद्धा ते हाल झाले, असे प्रकाश महाजन म्हणाले आहेत.

## अजित पवार म्हणाले - तुम्ही काय हसताय? माझा माणूस पडला तिकडे

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महायुतीला प्रचंड बहुमताने यश मिळाले आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर महायुतीने संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. मात्र पत्रकार परिषद झाल्यावर एक मजेदार किस्सा येथे घडला आहे. याचा व्हिडिओ देखील सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

महायुतीची पत्रकार परिषद झाल्यावर एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे तिघे नेते उठले. तितक्यात देवेंद्र फडणवीस यांना शिवाजी पाटील विजयी झाल्याची बातमी समजते व ते एकनाथ शिंदे यांना सांगतात. अजून एक आमदार आला आहे निवडून, असे म्हणत देवेंद्र फडणवीस हसून कपाळावर हात मारतात. त्यावर काय सांगता? असे शिंदे म्हणतात. तेव्हा फडणवीस म्हणतात हो हो शिवाजी पाटील जिंकले आहेत. त्यावर दोघे हसत असताना अजित पवार म्हणतात, अरे काय तुम्ही दोघं हसताय, माझा माणूस पडला न तिकडे, असे म्हणत ते देखील मिश्किलपणे हसतात. त्यानंतर उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार २५ नोव्हेंबर २०२४


## पराभवानंतर राज ठाकरेंनी बोलावली तातडीची बैठक



**मुंबई** : महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून महायुतीला बहुमत मिळाले आहे. तसेच २५ नोव्हेंबर रोजी वानखेडे स्टेडियम अथवा राजभवनात शपथविधी देखील होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी तातडीची बैठक बोलावली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बैठक बोलावली आहे. उद्या सकाळी राज ठाकरे यांच्या दादर येथील शिवतीर्थ या निवासस्थानी बैठक बोलावली आहे. मनसेचे प्रमुख नेते या बैठकीसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या बैठकीत राज ठाकरे काय बोलणार तसेच बैठकीत काय महत्त्वाचा निर्णय घेतला जाणार याकडे लक्ष असणार आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यंदाच्या विधानसभा निवडणुकीत १२८ मतदारसंघात उमेदवार उभे केले होते. मात्र, मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नाही. तसेच मनसेचा एकमेव आमदार राजू पाटील हे देखील पराभूत झाले आहेत. माहीम विधानसभा मतदारसंघात अमित ठाकरे यांचा देखील पराभव झाला आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या या दारुण पराभवानंतर राज ठाकरे यांनी बैठक बोलावली आहे. सोमवारी होणारी ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत भाजपने उत्तम कामगिरी केली आहे. १९९० नंतर विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकणारा भाजप हा पहिला पक्ष ठरला आहे. त्यामुळे आता महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर महायुतीमधील कोणता चेहरा पुढे येतो याकडे देखील सर्वांचे लक्ष असणार आहे.

## हेमंत सोरेन २८ नोव्हेंबरला मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार



**रांची** : झारखंडमध्ये पुन्हा इंडिया ब्लॉकचे सरकार स्थापन होणार आहे. रविवारी इंडिया आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांची मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठक झाली. यामध्ये हेमंत सोरेन यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर त्यांनी राजभवनात जाऊन मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि नवे सरकार स्थापन करण्याचा दावा केला.

राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदाच सरकारची पुनरावृत्ती होत आहे. आतापर्यंत प्रत्येक निवडणुकीत सरकार बदलत असे. राजभवनाबाहेर पत्रकारांशी संवाद साधताना हेमंत सोरेन म्हणाले- राज्यपाल संतोष गंगवार यांनी हंगामी मुख्यमंत्र्यांची नियुक्ती केली आहे. २८ नोव्हेंबरला शपथविधी होणार आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, युती ५ आमदारांसाठी एक मंत्रीपदाचा फॉर्म्युला ठरवू शकते. यामध्ये झामुमोला ६, काँग्रेसला १ आणि आरजेडीला १ मंत्रीपद मिळू शकते. राहुल गांधी आणि तेजस्वी यादव शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहू शकतात.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चाईबासाचे आमदार दीपक बिरुवा आणि घाटशिलामधून विजयी झालेले रामदास सोरेन हे पुन्हा नव्या सरकारमध्ये मंत्री होणार हे निश्चित मानले जात आहे. याशिवाय महतो व्होट बँक टॅप करण्यासाठी मथुरा महतो यांचा समावेश केला जाऊ शकतो.

जेएमएम हाफिझुल हसन आणि एमटी राजा यांच्यापैकी कोणालाही अल्पसंख्याक कोट्यातून मंत्री बनवू शकते. हफिजुल हे मागील सरकारमध्ये मंत्री होते. प्रादेशिक समतोल राखण्यासाठी पक्ष संथाल परगणा आणि उत्तर छोटानागपूरमधील एखाद्याला मंत्री म्हणून नियुक्त करू शकतो.

त्याचवेळी काँग्रेसमधील अल्पसंख्याक कोट्यातील एकमेव आमदार इरफान अन्सारी विजयी झाले आहेत. ते पुन्हा लॉटरी जिंकू शकतात. दुसरे नाव रामेश्वर ओराव असू शकते. ओराव हे मागील सरकारमध्ये अर्थमंत्री होते. हेमंत मंत्रिमंडळातील ते सर्वात श्रीमंत मंत्री होते.

काँग्रेस प्रदीप यादव आणि दीपिका पांडे सिंग यांना मंत्री करू शकते. तर, राजद पक्षाकडून संजय प्रसाद यादव आणि संजय कुमार यादव यांच्यापैकी एकाला मंत्री बनवण्याचे निश्चित मानले जात आहे.

## माझ्या मतदारसंघात जरांगेंचा परिणाम निश्चितपणे झाला, परंतु इतर मायनॉरिटीजने तारले : छगन भुजबळ




**नाशिक** : राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी महायुतीच्या विजयावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच लाडक्या बहीणींचा या विजयात मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. मनोज जरांगेंचा परिणाम केवल माझ्या मतदारसंघात मला पाहायला मिळाला आणि त्याचा परिणाम देखील झाला असल्याचे भुजबळ म्हणाले आहेत.

छगन भुजबळ म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीनंतर जे नैराश्य आले होते ते नैराश्य दूर करण्यामध्ये देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन प्रचंड मेहनत घेतली आहे. विशेषतः अजित पवार सकाळी ६ वाजता बाहेर पडायचे आणि रात्री उशिरा यायचे. सगळ्यांनीच खूप मेहनत घेतली. लोकांमधील संभ्रम दूर केला आणि या सगळ्यात लाडक्या बहिणीचा वाटा खूप मोठा आहे. वेळेवर सगळ्या बहिणींना पैसे मिळतील याचे नियोजन अजित पवारांच्या खात्याने केले. त्यामुळे सर्वांना खात्री पटली की हे सरकार जे बोलत आहे ते करत आहे. त्यामुळे जनतेने आपल्यावर विश्वास दाखवला, असे छगन भुजबळ म्हणाले.

शरद पवारांबद्दल बोलताना छगन भुजबळ म्हणाले, शरद पवारांनी माझ्या मतदारसंघात सभा घेतली तसेच माझ्या विरोधात कोणता उमेदवार द्यायचा याचा सगळ्याचा त्यांनी व्यवस्थित अभ्यास केला होता. त्याप्रमाणे त्यांनी निर्णय घेतले. पण आमचे मित्र जरांगे त्यांचे काय काम होते? त्यांनी तर सांगितले होते की मी या निवडणुकीत पडणार नाही, पाडणार नाही, बोलणार नाही, माझा कोणाला पाठिंबा नाही, माझा कोणाला विरोध नाही. पण प्रचार संपण्याच्या आदल्या दिवशी सकाळी १० वाजल्यापासून रात्री २ वाजेपर्यंत हाताला सलाईन आणि मी पाहा, मी आजारी आहे, माझे काहीही आता होईल, मी समाजासाठी मरतोय, यांनी विरोध केला आणि यांना पाडा. परंतु माझ्या मतदारसंघात त्याचा परिणाम निश्चितपणे झाला, माझ्या मताधिक्यावर त्याचा परिणाम झाला. परंतु, ते जेवढे झाले तेवढेच इतर जे मायनॉरिटीज आहेत, अगदी हिंदू असतील, मुस्लिम असतील, आदिवासी, ओबीसी सगळे एकवटले आणि त्यांनी आमचे तारू जे आहे ते किनाऱ्याला लावले.

आम्ही फक्त आमचा नेता विधिमंडळाचा अजितदादा पवार यांची सर्वानुमते नेमणूक केली आहे. आता शिंदे यांचे नेतेपदी कोण आहे, भाजपचे नेतेपदी कोण आहे ते अजून कळायचे आहे. परंतु आमचा देवेंद्र फडणवीस यांना विरोध असण्याचा काही कारण असेल असे मला तरी वाटत नाही.





